Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near
Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,
१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च
इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 Fax : 25665807 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.म./परीक्षा-७/ ६४८६
पुणे - ४११००४
दिनांक -२८/११/२०२२

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय :-** शास्त्रीय कला, (गायन,वादन,नृत्य), चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा–या व लोककला प्रकारात सहभागी होणा–या तसेच खेळाडू ,एन.सी.सी., स्काऊट व गाईड विद्यार्थ्यांच्या प्रस्तावांना छाननी शुल्क आकारणी करणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, सदर विषय दि.१४/१०/२०२२ च्या कार्यकारी परिषदपुढे सादर केला असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.

" माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) शास्त्रीय कला, (गायन,वादन,नृत्य), चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा–या व लोककला तसेच खेळाडू, एन.सी.सी., स्काऊट व गाईड प्रकारात सहभागी होणा–या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यासाठीचे प्रस्ताव शाळांकडून तसेच शिक्षणाधिकारी/जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांकडून विभागीय मंडळांना प्राप्त होतात.

सदरचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रत्येक प्रस्तावांची छाननी करावी लागते. सदर प्रस्तावांची छाननी केल्यानंतर प्रस्तावांमध्ये त्रुटी असतात त्या संबंधित शाळां/कनिष्ठ महाविद्यालय/जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेशी पत्रव्यवहार करून त्रुटींची पूर्तता करून घ्यावी लागते. सदरची यादी अंतिम केल्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या ग्रेडनुसार/खेळप्रकारानुसार शासन नियमाप्रमाणे गुण देण्याची कार्यवाही केली जाते.

शास्त्रीय कला (गायन,वादन,नृत्य), चित्रकला, लोककला तसेच खेळाडू ,एन.सी.सी., स्काऊट व गाईड प्रस्तावांची दरवर्षी वाढती संख्या लक्षात घेता सदर प्रस्तावांच्या छाननी कामासाठी व त्रुटीपूर्तता करण्यासाठी जादाचे रोजंदारी कर्मचारी वर्ग विभागीय मंडळ स्तरावर घ्यावा लागतो. सदर कामासाठी लागणारा वेळ, श्रम, इत्यादी सर्व बाबींचा विचार करून सदर प्रस्तावांची छाननी करणेकरिता फेब्रुवारी–मार्च २०२३ परीक्षेपासून प्रती विद्यार्थी रु. ५०/– (रू.पन्नास फक्त) छाननी शुल्क म्हणून शाळां/कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्रस्ताव सादर करत असतानाच चलनाद्वारे किंवा रोख रक्कम भरणा करूनच विभागीय मंडळस्तरावर प्रस्ताव स्वीकारण्यात यावेत अशी परीक्षा समितीने केलेल्या शिफारशीस मान्यता प्रदान करण्यात यावी तसेच सदर कार्यवाही मार्च–२०२३ च्या परीक्षेपासून अमलात आणावी असे सर्वानुमते ठरले."

तरी उपरोक्त ठरावाची नोंद घेऊन फेब्रुवारी–मार्च २०२३ च्या परीक्षेपासून प्रस्तावासोबत छाननी शुल्क स्वीकारूनच प्रस्ताव स्वीकारावेत. कोणत्याही परिस्थितीत छाननी शुल्क न आकारता किंवा कमी शुल्क आकारून प्रस्ताव स्वीकारू नयेत. सदरची बाब विभागीय मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करून सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांच्या निदर्शनास आणावी.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.